महाराष्ट्र शासन
ग्रामविकास विभाग ,
बांधकाम भवन,२५, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४०० ००१.

---

Email ID: itcell-rdd@mah.gov.in
दूरध्वनी क्र.-०२२-२२०१६७३७.
IT2016/CR59/ITCELL
दिनांक : १७/०९/२०२५.

---

प्रति,

१) मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
२) कार्यकारी अभियंता,जिल्हा परिषद/ पुणे, सिंधुदुर्ग, धुळे,रायगड,कोल्हापूर, गडचिरोली, यवतमाळ, जालना

**विषय :-** जिल्हा परिषद फंड मॉनिटरिंग सिस्टिम ( ZPFMS ) प्रणाली संदर्भात विविध जिल्हा परिषदांच्या अडचणीबाबत आढावा बैठकीचे इतिवृत्त.

विषयांकित प्रकरणी दि.१२ सप्टेंबर,२०२५ रोजी उपसचिव (मातंक) यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा परिषद फंड मॉनिटरिंग सिस्टिम ( ZPFMS ) प्रणाली संदर्भात विविध जिल्हा परिषदांच्या अडचणींबाबत आढावा बैठक घेण्यात आली होती. बैठकीचे इतिवृत्त माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

(स्नेहल अडसूळ)
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१. उपसचिव ( मातंक), ग्रामविकास विभाग,मंत्रालय मुंबई.
२. उपसचिव ( वित्त ), ग्रामविकास विभाग,मंत्रालय मुंबई.
३. व्यवस्थापक, बँक ऑफ महाराष्ट्र, मंत्रालय मुंबई.
४. राज्य समन्वयक, ZPFMS
५. निवड नस्ती, मातंक ग्रामविकास विभाग मंत्रालय,मुंबई

# बैठकीचे इतिवृत्त

बैठकीचा दिनांक :- १२ सप्टेंबर,२०२५
बैठकीची वेळ :- दुपारी १२.०० वाजता.

उप सचिव ( मातंक) यांच्या अध्यक्षतेखाली उपसचिव (वित्त) तथा सहसंचालक यांच्या उपस्थितीत जिल्हा परिषद फंड मॉनिटरिंग सिस्टिम प्रणाली संदर्भात विविध जिल्हा परिषदांच्या अडचणीबाबत आढावा बैठक दि. १२ सप्टेंबर,२०२५ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीसाठी उपस्थितांची यादी सोबत जोडली आहे.

उपरोक्त बैठकीमध्ये विविध जिल्हा परिषदांनी जिल्हा परिषद फंड मॉनिटरिंग सिस्टिम प्रणाली संदर्भात शासनास केलेल्या पत्रव्यवहाराच्या अनुषंगाने चर्चा करण्यात आली. सदर बैठकीचे इतिवृत्त खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | बैठकीमध्ये प्राप्त झालेले निर्देश | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|
| १. | जिल्हा परिषद पुणे, कोल्हापुर व यवतमाळ यांनी समग्र शिक्षा अभियान अंतर्गत केलेल्या कामांचे GEO Tagging फोटो अपलोड करण्याकरीता नविन आयडी तयार करण्यास मान्यता मिळण्याची विनंती केली होती, त्यानुसार बँक ऑफ महाराष्ट्राने सदर आयडी तयार करुन दिले आहेत. | -- |
| २. | GEO Tagging फोटो अपलोड करण्यासाठी तालुकास्तरीय अधिकारी यांना जिल्हा परिषदांच्या मागणी व आवश्यकतेनुसार प्रशिक्षण देणे. | बँक ऑफ महाराष्ट्र |
| ३. | GEO Tagging करीता फोटो अपलोड करताना OTP (one Time Password) करीता २ मिनीट एवढा वेळ आहे. तथापि ही वेळ वाढवून १० मिनिट इतकी करणे तसेच OTP टाकण्यासाठी सध्या ३ वेळा प्रयत्न करण्याची मुभा आहे ती वाढवून ५ वेळा इतकी करणे. तसेच OTP टाकताना ५ चुकीच्या प्रयत्नानंतर सदर Window बंद झाल्यावर ई-मेल केल्यावर ती उघडली जाते. तथापि कामात सुलभता येण्याच्या अनुषंगाने ती आपोआप ३० मिनीटांनी पुन्हा उपलब्ध व्हावी. | बँक ऑफ महाराष्ट्र |
| ४. | GEO Tagging फोटो अपलोड करण्याची जबाबदारी उप अभियंता यांच्यासह कनिष्ठ अभियंता ( Junior Engineers ) यांना देण्यासाठी लॉगिन सुविधा उपलब्ध करुन देण्याची मागणी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या कडून करण्यात आली.सदर बाबत प्रधान सचिव (ग्रामविकास) यांचे सोबत चर्चा करुन निर्णय घेण्याचे निश्चित करण्यात आले आहे. | उप सचिव (मातंक) |
| ५. | जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ नुसार कार्यालयासाठी आवश्यक असणारेनमुना नंबर १३ जमा नोंदवही तसेच, मासिक व वार्षिक लेखे सर्व अभिलेखा ZPFMS प्रणाली मधून online पध्दतीने अचूक व पारदर्शक तयार होत आहेत. त्यामुळे कार्यालयातून पारंपारिक/ online तयार होणारे अभिलेखांचे पुर्नलेखन टाळून तयार होणाऱ्या शासकीय अभिलेखास मान्यता प्रदान करण्यासंदर्भात जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांनी मागणी केली होती. त्याअनुषंगाने | उप सचिव तथा सह सचिव (वित्त)/ अवर सचिव (वित्त-६) |

| | | |
|---|---|---|
| | Account Code मध्ये दुरुस्ती करण्यासंदर्भात उपसचिव (वित्त) तथा सह संचालक यांनी जिल्हा परिषद लेखा संहिता मध्ये बदल करण्याच्या अनुषंगाने प्रधान सचिव (ग्रामविकास) यांचेसोबत चर्चा करुन यासंदर्भात कार्यवाही करावी असे निश्चित करण्यात आले आहे. | |
| ६. | जिल्हा परिषद फंड मॉनिटरिंग सिस्टिम प्रणालीमध्ये Deposit Register Online करण्याचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी (धुळे) यांनी प्रस्तावित केले आहे. Beneficiary समाविष्ट करण्याची सुविधा देण्याची मागणी करण्यात आली. जिल्हा परिषदांनी सदरहू बाबींची मागणी ऐनवेळी नव्याने केली असून आणखी काही मागण्या असल्यास त्या लेखी स्वरूपात शासनास दोन दिवसात सादर करण्याचे निर्देश सर्व जिल्हा परिषदांना देण्यात आले आहेत. | १) उप सचिव तथा सह सचिव (वित्त)/ अवर सचिव (वित्त-६)<br>२)संबंधित जिल्हा परिषदा |

उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाली.

(रविकुमार लिंगनवाड)
उप सचिव (वित्त) तथा सह संचालक

(प्रशांत पाटील)
उप सचिव (मा.तं. क.)

# बैठकीसाठी उपस्थितांची यादी

बैठकीचा दिनांक:- १२ सप्टेंबर,२०२५

बैठकीची वेळ :- दुपारी १२.०० वाजता

बैठकीचा विषय :- जिल्हा परिषद फंड मॉनिटरिंग सिस्टिम प्रणाली संदर्भात विविध जिल्हा परिषदांच्या अडचणीबाबत आढावा बैठक.

| अ.क्र. | पदनाम | कार्यालय / जिल्हा परिषद |
|---|---|---|
| १. | मुख्य लेखा व वित्त अधिकारी | पुणे |
| २. | मुख्य लेखा व वित्त अधिकारी | सिंधुदुर्ग |
| ३. | मुख्य लेखा व वित्त अधिकारी | धुळे |
| ४. | मुख्य लेखा व वित्त अधिकारी | रायगड |
| ५. | मुख्य लेखा व वित्त अधिकारी | कोल्हापूर |
| ६. | मुख्य लेखा व वित्त अधिकारी | गडचिरोली |
| ७. | मुख्य लेखा व वित्त अधिकारी | यवतमाळ |
| ८. | मुख्य लेखा व वित्त अधिकारी | जालना |
| ९. | कार्यकारी अभियंता | पुणे |
| १०. | कार्यकारी अभियंता | सिंधुदुर्ग |
| ११. | कार्यकारी अभियंता | धुळे |
| १२. | कार्यकारी अभियंता | रायगड |
| १३. | कार्यकारी अभियंता | कोल्हापूर |
| १४. | कार्यकारी अभियंता | गडचिरोली |
| १५. | कार्यकारी अभियंता | यवतमाळ |
| १६. | कार्यकारी अभियंता | जालना |
| १७. | उपसचिव ( मातंक), | ग्रामविकास विभाग,मंत्रालय मुंबई. |
| १८. | उपसचिव ( वित्त ), | ग्रामविकास विभाग,मंत्रालय मुंबई. |
| १९. | व्यवस्थापक, | बँक ऑफ महाराष्ट्र, मंत्रालय मुंबई. |
| २०. | राज्य समन्वयक, | ZPFMS |
| २१. | कक्ष अधिकारी, मातंक | ग्रामविकास विभाग मंत्रालय,मुंबई |